International Journal of Advance and Applied Research (IJAAR)
Peer Reviewed Bi-Monthly
ISSN – 2347-7075
Impact Factor – 0.899
Vol.4 No.3 Jan - Feb 2017

# शहिद भगतसिंग यांचे स्वराज्यविषयक विचार : एक अभ्यास

**श्रेयश मोहिते**
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर .

**राहूल कांबळे**
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर .

**प्रस्तावना :**

भारतीय स्वातंत्र्य काळात वेगवेगळया विचारसरणीनी काम करणारी आणि 'स्वराज्य' हेच अंतिम उद्दिष्ट असणारी बरीच मंडळी कार्यरत होती. त्यापैकी जहाल, मवाळ, गांधीवादी , सशस्त्र क्रांतीकारक आणि समाजवादी या मंडळींचे उल्लेखनीय कार्य दिसून येते. त्याचबरोबर भगतसिंग, राजगुरू सुखदेव यांच्या हिंदूस्थान रिपब्लिकन सोशलिस्ट असोसिएशन या संघटनेचे कार्य स्वांतत्र्य लढयातील एक उल्लेखनीय पर्व होते. ज्याकाळात महात्मा गांधीच्या सत्याग्रही व अहिंसेच्या मार्गावर देश विश्वास ठेऊन होता व क्रांतीकारकांच्या सशस्त्र चळवळी सामान्य जनेतेपर्यंत पुरेश्या पोहचलेल्या नव्हत्या, त्याकाळात भगतसिंगच्या तत्त्वज्ञानी सशस्त्र क्रांतीकारी कार्याला सुरवात झाली होती.

एच. एस. आर. ए. च्या पूर्वी भारतीय स्वांतत्र्य लढयात अभिनव भारत, गदर व तत्सम क्रांतीकारी संघटनांनी आपला सशस्त्र क्रांतीचामार्ग निश्चित केला होता परंतु भगतसिंगची क्रांतीकार्याची चळवळ ही केवळ सशस्त्र क्रांतीच्या मार्गाने स्वातंत्र्य मिळविणे इथपर्यंत मर्यादित नव्हती. भगतसिंगाचे तत्वज्ञान हे सबंध मानवजातीच्या मुक्तीचे व शोषण विरहीत समाजव्यवस्थेची मागणी करणारे मार्क्सवादी व लेनीनवादी तत्वज्ञान होते. डॅन ब्रिनच्या आयरिश स्वातंत्र्य लढयाच्या पुस्तकाचे हिंदीत भाषांतर करणे, मार्क्सची, लेनीनची वर्गविरहीत समाजाची मागणी करणारे तत्वज्ञान वाचणे व त्यांचा आग्रह धरणे ही भगतसिंगच्या डाव्या विचारसरणीच्या प्रभावाचीकाही उदाहरणे सांगता येतील.

स्वातंत्र्य मिळावे व ते आपण लढूनघेऊ, भले मार्ग कोणताही असेल पण मिळालेल्या स्वातंत्र्याच्या राज्यात कष्टकरी जनतेचे, कामगार वर्गाचे, शेतकऱ्यांचे व

विद्यार्थ्यांचे स्थान काय असेल? माणसाची माणसाकडून होणारी पिळवणूक नव्या राष्ट्रात थांबेल? अन्न , वस्त्र, निवारा या मुलभूत गरजा सर्व राष्ट्रबांधवांना मिळतील ? आणि जर नाही मिळाल्या तर मिळणाऱ्यास्वातंत्र्याची सुत्रे कोणत्या सत्ताधिशांच्या ताब्यात जातील? हे प्रश्न भगतसिंगच्या याच स्वराज्य विषयक संकल्पनेचा अभ्सास करण्याचा प्रयत्न प्रस्तुतशोधनिबंधामध्ये केलेला आहे.

**तत्कालीन राजकीय व सामाजिक पार्श्वभूमी :**

भारतीय स्वांतत्र्य लढयामध्ये १८५७ चे पर्व हे एक इतिहास प्रसिध्द व नोंद करण्यासारखे होते. त्याला स्वातंत्र्य युध्द म्हणावे की नाही? की शिपायांचे बंड म्हणावे? हा वादाचा मुद्‌दा असू असू शकेल, परंतु ब्रिटीशांच्या प्रचंड साम्रज्या विरोधात भारतीयांनी केलेल तो पहिला विद्रोह होता. निश्चित तत्वज्ञान नसल्यामुळे, निश्चित नियोजन नसल्यामुळें तो प्रयत्न फसला व ब्रिटीशांनी भारतीयांबद्‌दलच्या धोरणांमध्ये बदल केला. भारतीयांच्या धार्मिक बाबतीत हस्तक्षेप टाळणे, सैन्य भरतीमध्ये शिथिलता आणणे, संस्थानिकांशी संबंध सुधारणे या बाबीवर भर दिला. त्यानंतर भारतात इंग्रजांच्याविरोधामध्ये छोटे—मोठे उठाव होत राहिले. परंतु कुठलाही उठाव निश्चित तत्वज्ञानाअभावी व नियोजनाअभावी फसला गेला.

१८८५ ला कॉंग्रेसची स्थापना सर ॲलन ह्युमच्या पुढाकाराने झाली. भारतीय स्वातंत्र्यासाठी प्रयत्न करणाऱ्या भारतीय नेत्यांची संघटना एका ब्रिटीश व्यक्तीने स्थापन केली हे कॉंग्रेसचे एक मोठे वैशिष्ट म्हणावे लागेल. कॉंग्रेसच्या सुरवातीच्या काळातील पुढाऱ्यांमध्ये व्योमेशचंद्र बॅनर्जी, फिरोजशहामेहता, न्यायमुर्ती रानडे, गोखले, दादाभाई नौरोजी या मवाळ पुढाऱ्यांच्या समावेश होता. चर्चा निवेदने, अर्ज—विनंत्या या मार्गानी ब्रिटीशांशी शांततापूर्वक मार्गाने लढून आपल्या मागण्या मान्य करून घेणे हेच कॉंग्रेसचे सुरवातीच्या काळातील उद्‌दिष्ट होते. काळानुरूप दादाभाई नौरोजींनी ब्रिटीशांच्या पिळवणूकी विरोधात आवाज उठवला. आर्थिक नि:सारणच्या सिध्दांतामधून भारतीय जनेतेच्या पिळावणूकीचे सत्य दादाभाईंनी सर्वप्रथम मांडले. कॉंग्रेसमध्ये जहालांचा आणि मवाळांचा आता उघड उघड संघर्ष होऊ लागला होता मवाळांची अर्ज विनंत्यांची पध्दती जहालांना अजिबात पटत नव्हती. म्हणूनच जहालवादी गटाचे नेते लोकमान्य

टिळक आणिमवाळवादी गटाचा वाद कॉंग्रेसमध्ये चिघळला व त्याची निष्पत्ती १९०७ च्या सुरत अधिवेशनातील फुटीत झाली. चाफेकर बंधुनी रॅडची हत्या केली. दरम्यान 'अभिनव भारत' चे कार्य देशभर पसरले होते. क्रांतीकारी चळवळींची अशी पार्श्वभूमी असताना पंजाब प्रांतातील गदरची चळवळ जी १९१३ ला स्थापन झाली होती ती अमेरिका व कॅनडात कार्यरत होती. सोहनसिंग भाकना, कर्तारसिंग सराभा, लाला हरदयाल यांच्या कार्याचा प्रभाव भगतसिंगावर पडला काका अजितसिंग हे देखिल सशस्त्र क्रांतीच्या मार्गावर विश्वास ठेवणारे होते. अशी क्रांतीकारी पार्श्वभूमी असताना भगतसिंगचे व्यक्तीमत्व घडत होते.

तत्कालीन सामाजिक परिस्थिती ही अस्पृश्यता,भेदाभेद ,धार्मिक कर्मकांड व जातीय व धार्मिक तणाव यांनी ग्रासलेली होती. मुस्लिम लीगची स्थापना हिंदुच्या राज्यात मुस्लिमांचे स्थान काय? हा प्रश्न विचारत होती. भारतात त्या काळात हिंदू—मुस्लिम सैनिक आता एकमेकांकडे व्देषपूर्ण नजरेने पाहत होते. देशभरामध्ये साक्षरतेचा गहन प्रश्न होता. अज्ञान, अंधश्रध्दा, दारिद्रय या समस्यांनी भारत देश ग्रासला होता शेतकऱ्यांचे प्रश्न मोठया प्रमाणात निर्माण झाले होते. कामगारांच्या राहणीमानाबद्दल, आरोग्याबद्दल, सुरक्षिततेबाबत कोणतीच उपायोजना नव्हती. अश्या परिस्थितीत भगतसिंगने निवडलेला मार्क्सवादी क्रांतीचा मार्ग हा जास्त प्रस्तृतहोता.

**भगतसिंगांचा जीवन प्रवास :**

भगतसिंगांचा जन्म लाहोर प्रांतातील बंगा या गावी २७ सप्टेबंर १९०७ रोजीझाला. लहानपणापासूनच भगतसिंगांवर घरातील आर्य समाजाच्या संस्काराचा प्रभाव होता. भगतसिंगांच्या जन्मावेळी त्यांचे वडील किशनसिंग व काका स्वर्णसिंग तुरूंगात होते. दुसरे काका अजितसिंग हे गदर पक्षातील प्रमुख नेते होते. भगतसिंगचे पुर्ण घराणे हे धार्मिक सुधारणा सांगणाऱ्या आर्य समाजाचे अनुयायी होते.आणि म्हणूनच भगतसिंगची जडण—घडण ही कट्टरवादापासून दूर राहिली. भगतसिंगाचे प्राथमिक शिक्षण गावातील शाळेतचझाले. १९१६ ला लाहोरच्या दयानंद ॲग्लो वैदिक शाळेत ते शिकू लागले. वयाच्या १८ व्या वर्षी लाहोर कटात हसत हसत फासावर जाणाऱ्या

कर्तारसिंग सराभा यांच्याबद्दल त्यांना प्रचंड आकर्षण वाटू लागले. रौलट ॲक्ट विरोधातसुध्दा डी. ए. व्ही. शाळेच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.त्यातसरदार भगतसिंगांची सहभाग घेतला होता. अमृतसर येथिल जालियनवाला बाग येथे सभेसाठी जमलेल्या नि:शस्त्र लोकांवर जनरल डायरने केलेल्या गोळीबारात ३७९ लोक ठार झाले होते. ज्याचे ब्रिटीश सरकारने समर्थन केले होते. जनरल डायरला दिले गेलेल्या २०,००० पौंडाची थैली ही भारतीयांचा आणि मानवतेचा अपमान आहे असे भगतसिंगला वाटले.

असहकार आंदलनात भगतसिंगने शाळा सोडून सहभाग घेतला होता. कित्येक विद्यार्थ्यांनी शाळांवर बहिष्कार टाकून या आंदोलनात सहभाग घेतला होता. प्रिन्स ऑफ वेल्सच्या भारतातील आगमनावेळी भारतभरामध्ये हरताळ आणि निदर्शने झाली होती. असहकार आंदोलन ऐन भरात असताना चौरीचौराच्या घटनेवरून गांधीजींनी असहकार आंदोलन मागे घेतले. भगतसिंगसह शिक्षण आणि नोकऱ्या सोडून आंदोलनात सहभागी झालेल्या हजारो तरूणांना हा विश्वासघात वाटलाआणि गांधीजींच्या स्वातंत्र्य मिळविण्याच्या मार्गावरून त्यांचा विश्वास उडाला.भगतसिंगचे पुढचे शिक्षण लाला लजपतरायांनी स्थापन केलेल्या लाहोर येथिल नॅशनल कॉलेजमध्ये झाले. तेथे त्यांची भेट सुखदेव, यशपाल इ. भविष्यातील एच.एस आर. ए च्या सदस्यांशी झाली.

नॅशनल कॉलेजमध्ये असताना भगतसिंगानी डॅन ब्रिन यांचे ‘माय फाइट फॉर आयरीश फ्रिडम’, मॅझिनी व गॅरिबाल्डी यांचे चरित्र, फ्रेंच राजयक्रांतीचा  इतिहास, रूसो, व्हॉल्टेअर यांचे विचार, रशियन क्रांतीकारकांचे चरित्र, रौलट कमिटीचा रिपोर्ट इ. पुस्तके वाचलीत. त्याकाळात नॅशनल कॉलेजमध्ये ही पुस्तके फार लोकप्रिय होती. टॉलस्टॉय आणि तुर्गनोव  यांच्या कादंबऱ्या त्या काळात भगतसिंगांच्या वाचनात आल्या. ज्यामुळे भगतसिंगाचा विचार हा साम्यवादी विचारसरणीशी घट्ट जुळला गेला.

भगतसिंगच्या एकूणच कार्यकिर्दीतले अत्यंत महत्वाचे पर्व म्हणजे ‘नौजवान भारत’ सभेची स्थापना. कॉलेजमध्ये असतानाच भगतसिंग, भगवती चरण, सुखदेव, यशपाल, रामचंद्र कपूर यांनी नौजवान भारत सभेची स्थापना केली. या सभेचे भगतसिंग जनरल सेक्रेटरी व प्रचार सेक्रेटरी भगवतीचरण होते. या  भगवतीचरणांचा सरहद्द प्रातांत स्थापन झालेल्या कम्युनिस्ट पक्षाशी घनिष्ठ संबंध होता. नौजवान भारत

सभेचे उद्दिष्टच हे होते की गांधीच्या तडजोडवादी तत्वज्ञानाशी संघर्ष करून साम्यवादी तत्वज्ञान अंगिकारणे. त्याचबारोबर जात—धर्म यांतील भेदाभेद नष्ट करून जनतेची एकजुट करणे हे नौजवान भाारत सभेचे एक धोरण होते. नौजवान भारत सभेतर्फे 'कर्तारसिंगा सराभा' जे लाहोर कटात फासावर गेले होते, त्यांच्या गौरव करणारी सभा लाहोरच्या बरसी बॉडला हॉलमध्ये घऊन सशस्त्र क्रांतीचा पुरस्कार करण्यात आला. त्याचकाळात लाहोर व्यतीरिक्त दिल्ली, कानपूर, बंगाल वगैरे ठिकाणी असलेल्या क्रांतीकारकाशी संपर्क साधण्यासाठी लाहोर सोडले होते. त्याचे वडील त्याला लग्नासाठी सतत विचार होते. हे सुध्दा लाहोर सोडण्याचे दुसरे कारण होते. स्वातंत्र्य मिळाल्याशिवाय लग्न करणार नाही, असा त्यांचा निश्चय होता.

'अर्जुन' वर्तमानपत्रातभगतसिंगने लेखन सुरू केले. दिल्लीहून कानपूरला आलयावर वर्तमानपत्र विकण्याचेही काम त्यांनी केले. गणेश शंकर विद्यार्थी यांच्या 'प्रताप' या वर्तमानपत्रातसुध्दा त्यांनी लेखन केले. भगतसिंग हिंदी, उर्दू, पंजाबी, आणि इंग्रजी या चारही भाषेतून लिखाण करीत असे. या चारही भाषेवर त्यांचे प्रभुत्व होते. कानपूरमधील शिव वर्मा, जयदेव कपूर, विजयकुमार सिन्हा यांच्या संपर्कामुळे भगतसिंग एच.एस. आर.ए.शी जोडले गेले. तिथून पुढे भगतसिंगाच्या क्रांतीकारी कार्याला खऱ्या अर्थाने सुरवात झाली. भगतसिंगचे तत्वज्ञान ' मी नास्तिक का आहे' या लेखातून शोधायचे झाल्यास भगतसिंगांचे तत्वज्ञान हे आता पूर्णपणे साम्यवादी झाल्याचे दिसून येते. कारण तर्काधिष्ठीत तत्वाज्ञानाची मांडणी त्यांनी या लेखाव्दारे केलेली आहे.

लाहोरमध्ये दसरा मेळाव्यात १९२७ साली झालेल्या बॉम्बस्फोटाच्या संशयावरून भगतसिंग व बाबूसिंग यांना काही कालावधीसाठी अटक झाली. त्याकाळी काकोरी कटाच्या चौकशीमध्येही भगतसिंगांवर मोठा दबाव आणला गेला. बक्षिसाची लालूस दाखविली. पण भगतसिंग व त्यांचे सहकारी डगमगले नाहीत. त्यांनंतर भगतसिंग भूमिगत राहून कार्य करू लागले. १९२८ साली दिल्लीतील फिरोजशाह कोटला किल्ल्याच्या परिसरात भारतातील सर्व क्रांतीकांची बैठक बोलाविली. याच बैठकित एच.एस आर ए. च्या नावाबद्दल ऐतिहातिक निर्णय घेऊन भगतसिंगने आपली

स्वराजयाची संकल्पना स्पष्ट केली. हिंदूस्थान रिपब्लिकन असोसिएशन या संघटनेच्यानावात सोशालिस्ट हा शब्द केले.

३फेब्रुवारी १९२८ रोजी सायमन कमिशन भारतात आले.त्यावेळी नैजवान भारत सभेने केलेलया निदर्शनामध्ये नेतृत्व करणाऱ्या लाला लजपतरायांवर पोलिसांनी क्रूरपणे लाठीचार्ज केला व त्यामध्येच त्यांचा मृत्यू झाला. याचा बदला घेण्यासाठी १७ डिसेंबर १९२८ ला भगतसिंग, राजगुरू, सुखदेव यांनी सैंडर्सला गोळया घालून ठार केले. भगतसिंगने जतिंद्रनाथ दास यांच्या मदतीने आग्राला बॉम्ब बनविण्याचा कारखाना सुरू केला. ब्रिटीशांनी जेव्हा कामगारांच्या हक्कांच्या विरोधात असणारे ‘ट्रेड डिस्पुट ॲक्ट’ आणि ‘पब्लिक सेफ्टी बील’ आणण्याचे ठरविले, तेव्हा त्याचा निषेध करणाऱ्या कित्येक क्रांतीकारकांना देशद्रोहाचा आरोप ठेऊन अटक केली. या अटकेच्या निषेधामध्ये ८ एप्रिल १९२९ रोजी बटुकेश्वर दत्त आणि जयदेव कपूर यांच्या साथीने भगतसिंगांनी ॲसेंब्लीमध्ये बॉम्ब टाकला. परंतु या बॉम्बमुळे कुणालाही इजा होणार नाही याची पुरेपुर काळजी घेतली गेली. ‘‘आम्ही भ्याड नाही आहेत. आमचा मानवतेवर विश्वास आहे.’’, असे सांगत ते पोलिसांच्या स्वाधीन झाले. भगतसिंग व बटुकेश्वर दत्त यांना जन्मठेपेची शिक्षा झाली. तुरूंगात त्यांना अमानुष वागणूक मिळत होती. राजकीय कैद्यांना सन्मानाची वागणूक मिळावी, पुस्तके, वर्तमानपत्र मिळावित म्हणून भगतसिंगने १४ जून १९२९ ला अन्नसत्याग्रहास सुरवात केली. भगतसिंग, राजगुरू, सुखदेव यांसह १४ जणांना अटक केली. क्रांतीकारकांचा अन्नसत्याग्रह अद्याप सुरूच होता. ६३ दिवसांच्या अन्नसत्याग्रहानंतर १३ सप्टेंबर १९२९ ला जतिंद्रनाथ दास यांचा मृत्यू झाला. त्यांनतर भारतीय जनतेने मोठया प्रमाणात भगतसिंगांना पाठिंबा दर्शवला. जगभरामध्ये भगतसिंगाची चर्चा होऊ लागली. ब्रिटिशांना हा खटला हरण्याची भिती वाटू लागली आणि व्हाईसरॉयने लाहोर खटला खास वटहुकूम, १९३० काढला. यासाठी खास कोर्ट निर्माण करण्यात आले. आरोपींच्या गैर हजेरीत देखिल कोर्टाचे कामकाज सुरू ठेवण्याचा अधिकार मिळाला. या कोर्टाच्या निर्णयानुसार भगतसिंग, राजगुरू व सुखदेव यांना फाशीची शिक्षा सुनावण्यात आली. वास्तविक २४ मार्च १९३१ रोजी देण्यात आलेली फाशीची शिक्षा ब्रिटिश सरकारला जनतेच्या क्षोभाच्या वाटत असलेल्या भितीमुळे एक दिवस आधीच २३ मार्चच्या सायंकाळीच देण्यात

आली. भगतसिंगचे अवघे २३ वर्षांचे धगधगते आयुष्य हे संपूर्ण भारतीयांसाठी प्रेरणादायक व स्फुर्तीदायक ठरले.

**भगतसिंग यांचे स्वराज्य विषयक विचार :**

भारतीय स्वातंत्र्या लढयांच्या चळवळीत भगतसिंग हे पूर्णपणे कम्यूनिस्ट विचारधारेशी एकवटले होते याबाबात अजिबात शंका नाही. 'स्वराज्य' संबंधी भगतसिंगचे विचार हे मार्क्सवादी, लेनीनवादी विचारावर आधारित होते.भगतसिंग हे प्रखर राष्ट्रवादी होते. परंतु तो राष्ट्रवाद धर्मनिरपेक्ष लोकशाहीवादी मूल्यांवर आधारित होता. वर्गविरहीत व जातविरहीत समाजव्यस्थेचे राष्ट्र अशी त्यांची भारताच्या स्वराज्याबद्दलची संकल्पना होती. गदर पक्षाच्या धर्मनिरपेक्ष मूल्याचा भगतसिंग यांच्यावर विशेष प्रभाव होता. त्याचेकाका सरदार अजितसिंग हे कॉंग्रेसमधील जहाल गटाचे नेते होते. त्याचबरोबर लालजी, टिळक आणि अरविंद घोष यांच्या जहालवादाचा भगतसिंगवर विशेष प्रभाव होता. त्यातूनच त्यांची जडणघडण एक अभ्यासू क्रांतीकारी म्हणून झाली. भगतसिंग हे शास्त्रीय समाजवादाचे पुरस्कर्ते होते.

भारतातील क्रांतीकारकांच्या चळवळीत परदेशी क्रांतीकारकांचा देखील प्रभाव होता. म्हणूनच 'किर्ती' या नियतकालीकात भगतसिंगाने लिहलेले रशियन क्रांतीकारकाचे ३६ लेख सापडतात.भगतसिंग रशियातील अराज्यवादावर लिहिलेल्या लेखात म्हणतो की अराज्यावाद हे उच्च दर्जाचे व आदर्शवादाचे तत्वज्ञान असून ते समाजवाद, साम्यवाद आणि विश्वबंधुत्वाचा पुरस्कार करणारे आहे. अराज्यवादी जगातून धर्म, ईश्वर, राज्यसंस्था , खाजगी मालमत्तेचा यांचा नाश करू इच्छितात, कारण ही सत्ताधारी वर्गाच्या हातातील शोषणाची साधने आहेत. अराज्यवादी म्हणतात त्याप्रमाणे खाजगी मालमत्तेचा अधिकार रद्द करण्यात यावा आणि संपत्ती सामाजिक मालकीची करण्यात यावी. भगतसिंग किर्तीच्या आपल्या तिसऱ्या लेखात अराज्यवादाच्या क्रांतीकारी मोहिमांची माहिती देतात. यावरून हे लक्षात येते की भगतसिंग हे अगदी लहानवयात जगभरातील सर्व क्रांत्यांचा अभ्यास करून भारतासंबंधी स्वराज्यविषयक आपले तत्वज्ञान मांडणारे अभ्यासू क्रांतीकारक होते.

भगतसिंग म्हणतात त्याप्रमाणे भाषा आणि संस्कृतीमधील वेगवेगळेपणा हा भेदभावावर आधारित असू नये. भगतसिंग त्यासाठी पंजाबचे उदाहरण देतो. प्रत्येक राज्यातील मुस्लीम हे त्या राज्यातील भाषा आपली मानतात. परंतु पंजाबातील मुस्लिम उर्दुला आपली भाषा मानतात आणि पंजाबातील शीख गुरूमुखी लीपीला आपली मानतात, परंतु दोघांनाही पंजाबी भाषा जवळची वाटत नाही. भाषीक एकता जपताना भेदभावावर आधारित भाषेचे विभागणी भगतसिंगाना अमान्य होती. उद्याचा भारत हा भाषीक वेगळेपणा बरोबरच सांस्कृतिक एकतेचा पुरस्कर्ता असायला हवा.

'किर्ती' या नियतकालीकात भगतसिंग यांनी बराच काळ लेखन केले १९२८ मध्ये प्रकाशित झालेल्या एका लेखत भगतसिंग सामाजिक सुधारणांबाबात आणि अस्पृश्यता निवारणाबाबत बोलतात. समाजातील अस्पृश्यतेची प्रथा निंदनीय असून आपण आपल्या बांधवांना पशुपेक्षा हीन लेखतो या गोष्टीची भगतसिंगाना प्रचंड चीड यायची. ''सनातनी लोकांवर धर्माची जबाबदारी असे, असे जर ते मानत असतील तसेच आपण देशभक्त आहोत असा जर त्यांचा दावा असेल तर ते कोटयावधी निरपराध लोकांना अस्पृश्य आणि गुन्हेगार कसे काय समजातात? असा सवाल भगतसिंग विचारताता दिसतात, आणि उद्या मिळालेल्या स्वातंत्र्यात या निरपराध लोकांना संधीची समानता मिळणार की नाही हा प्रश्न भगतसिंगाने उपस्थित केला. देशात जर जातीय आणि धार्मिक तणाव वाढविण्याचे प्रयत्न होत असतील तर मिळालेल्या स्वातंत्र्यात नागरिक भारतीय म्हणून राहतील की, नाही याची भगतसिंगला शंका वाटत होती. भगतसिंग म्हणतात की अस्पृश्यांना सर्व अधिकार प्राप्त झाले पाहिजेत. विधानसभांमधून त्यांचे स्वत:चे लोकप्रधिनिधी असले पाहिजेत.त्यासाठी त्यांनी जादा अधिकार असले पाहिजेत.

भगतसिंग यांचा जुलै १९२८ चा 'विद्यार्थी आणि राजकारण' हा लेख प्रसिध्द आहे. विद्यार्थ्यानी सामाजिक आणि राजकिय प्रश्नांचा अभ्यास केला पाहिजे आणि ते प्रश्न समजून घेतले पाहिजेत असे भगतसिंग म्हणतात. समाजात जेव्हा चळवळी निर्माण होतात तेव्हा त्या समजून घेऊन त्यात उद्याच्या स्वतंत्र भारतात फक्त साक्षर विद्यार्थी नकोत, कारकून नकोत तर देश बदलू इच्छिणारा एक सक्षम मानव हवा.

भारतात हिंदु आणि मुस्लिम यांनी एकत्रित येऊन ब्रिटिश सत्तेला आव्हान देऊ नये यासाठी इंग्रजांनी फोडा आणि राज्य करा या नितीचा अवलंब केला. उद्या देश स्वतंत्र झाल्यावर जर आपण हिंदू–मुस्लिम ऐक्य नाही करू शकलो तर तो भारतीय स्वराज्याचा अपमान होईल. स्वराज्य मिळूनही काही फायदा होणार नाही. कारण मिळालेले स्वराज्य नागरिक हिंदू आणि मुस्लिमांमध्ये वाटून सांप्रदायिक गटा–तटात विभागून जातील. भगतसिंग यांनी याबाबतीत जमातवादी पुढारी आणि वर्तमानपत्रे यांच्यापासून जपून रहाण्याचा सल्ला दिलेला दिसतो. कारण जेव्हा देशभक्त/राष्ट्रावादी नेते देशातील जनतेपासून दूर जातात तेव्हा जमातवादी पुढारी समाजाला विभागतात, धर्मांधता पसरवतात, तेव्हा स्वत:ला राष्ट्रवादी म्हणवून घेणारे लोक प्रतिक्रीया देत नाहीत.त्याचबरोबर वर्तमानपत्रे हे जातीय दंगली घडविण्याचे दुसरे साधन आहे. वर्तमानपत्रे भडक मथळे देऊन लोकांना हिंसा कारायला प्रवृत्त करतात. वास्तविकरित्या लोकांना शिक्षण देणे, त्यांच्यातील संकुचित प्रवृत्ती दूर करणे, राष्ट्रीय एकता बळकट करणे ही कामे वर्तमानपत्रानी केली पाहिजेत.त्यासाठी आपल्यासमोरचे आर्थिक प्रश्न लोकांना समजावून सांगून धर्म, जात, वंश, राष्ट्र, वर्ण यांचा भेद न करता रशियन जनेतेप्रमाणे आपण एकत्र आले पाहिजे. लोकांनी आपल्या देशाच्या विकासाच्या कामात गुंतले पाहिजे.

दिनांक ५ व ६ ऑक्टोबर १९३० रोजी भगतसिंगने तुरूंगात आसताना ‘ मी नास्तिक का आहे?’ हा लेख लिहीला व तो ‘The People’ या मासिकात २७/०८/१९३१ रोजी रोजी प्रकाशित झाला. या लेखात त्यांचा बुध्दीवादी दृष्टीकोन दिसून येतो. त्यांच्यामते मानवी जीवनात विज्ञान आणि विवेक यांच्यामुळेच प्रगती झाली. विज्ञानातील प्रत्येक निष्कर्ष हा बुध्दीच्या कसोटीवर घासून बघितला जातो. जसजसा विज्ञान आणि सृष्टीविषयक ज्ञान यांचा विकास होत जाईल तसतसा अंधश्रध्देचा आपल्या ईश्वरील विश्वासाचा ऱ्हास होत राहील, कारण त्यांना सत्य काय आहे हे समजून येईल. स्वतंत्र भारतात वैज्ञानिक दृष्टीकोन आणि विज्ञानाला महत्व प्राप्त व्हायला हवे.

भगतसिंग गांधी व कॉग्रेसवर टिका करताना असे लक्षात येते की भगतसिंग हे तात्विकदृष्टया अत्यंत वरच्या दर्जाचे विचारवंत होते. ते म्हणतात की कॉग्रेस हा पक्ष

मध्यमवर्गियांचा, पांढरपेशांचा व दुकानदारांचा पक्ष आहे. कामगार आणि किसानयांचा त्यात समावेश नाही. म्हणूनच तेव्हा देशाचे राष्ट्रीय नेतृत्व शेतकरी आणि कामगारांचे प्रतिनिधीत्व करीत नसेल तर त्या देशात दुर्बल घटकांचा विकास दुरापस्त होऊन बसतो.म्हणूनच गांधीवादी मार्गाने स्वांतंत्र्य मिळवून समाजवादी राष्ट्र निर्माण करणे अशक्य आहे असे भगतसिंग म्हणतात.

भगतसिंग हे पुरोगामी राष्ट्रवादी होते, त्यांचा राष्ट्रवाद हा धर्मनिरपेक्ष होता. ते नेहमी प्रश्न करायचे की राष्ट्रीय क्रांती करून आपण कोणती समाजरचना स्थापन करणार आहोत? इंग्रज सत्ताधिशांना इथून हाकलून लावले आणि इथल्या व्यवस्थेची सुत्रे जर सरंजामदार आणि भांडवलदारांच्या हातात गेली तर इथल्या स्वांतंत्र्याचा काय उपयोग? भगतसिंग भारतासाठी सार्वभौम राष्ट्राचा आग्रह धरत होते. देशात राज्य करणारे शासन हे लोकशाही पध्दतीने असले पाहिजे आणि ते जनतेच्या पाठिब्यांवर असले पाहिजे. भारताचे गणराज्य हे धर्मनिरपेक्ष असले पाहिजे आणि तिथे कोणत्याच धर्माला अधिकृत धर्म म्हणून मान्यता मिळायला नको.भगतसिंग यांना लोकशाही क्रांती अपेक्षित होती. आणि त्यातुनच ते समाजवादी क्रांतीचा आग्रह धरत होते. सुरवातीला भगतसिंगवर अराज्यवादी विचारवंतांच्या विचारांचा प्रभाव होता. पण लाला छबिलदास व सोहनसिंग यांनी त्या विचारातील कमजोऱ्या दाखवून दिल्या तेव्हा भगतसिंग मार्क्सवाद आणि लेनीनवादाकडे वळाले. भारतातील प्रस्थापित समाजव्यवस्था नष्ट करून त्या जागी समाजवादी व्यवस्था स्थापन केली पाहिजे. हा विचार भगतसिंग सतत मांडत राहिले. मार्क्स व एंजेल्सच्या शास्त्रीय समाजवादाच्या आधारे भारतात कामगार आणि किसान यांचे राज्य स्थापन व्हावे, पण ही संकल्पना सत्तांतरापुरती मर्यादित नव्हती, तर ती समग्र परिवर्तनाची होती. क्रांती म्हणजे सततचे युध्द किंवा व्यक्तीगत सुड नव्हे, तो बॉम्ब फेकण्याचा पंथसुध्दा नव्हे तर क्रांती म्हणजे प्रस्थापित व्यवस्था मुळासकट उपटून टाकून न्याय व समाजवादावर अधारित नवी व्यवस्था निर्माण करणे होय. शेतकरी आणि कामगार हे भांडवलशाही शक्तींचा बळी पडायला नकोत. त्यासाठी नव्या व्यवस्थेत त्यांच्याबाबतच्या न्यायाची तरतुद करायला हवी, असे भगतसिंगांचे मत होते.

'आम्ही कशासाठी लढतो आहोत' या लेखात भगतसिंग म्हणतात, 'जनतेसाठी जनतेकडून क्रांती करून घ्यायला हवी. क्रांतीनंतर स्थापन होणारे राज्य पुर्णत: जनतेचे असेल. परंतु त्यासाठी सर्वप्रकारचा त्याग करायला जनतेने तयार राहीले पाहिजे. ग्रामीण पुर्नरचनेचे काम हाती घेतले पाहिजे. क्रांतीकारी कम्युनिस्ट पक्षच पुर्नरचना करू शकते त्यासाठी सर्व सत्ता यांच्या हातात असायला हवी. कारण राष्ट्रीय क्रांती झाली आणि भांडवलदार वर्ग प्रभावी झाला तर तो शेतकरी व कामगाराकडे दुर्लक्ष करेल. शेतकऱ्यांना संघटित करण्याचे काम भविष्यात व्हायला हवे. कामगारांना संघटित करण्याचे काम भविष्यात व्हायला हवे. समाजवादयांना असा समाज स्थापन करावयाचा आहे की जिथे कोणत्याही प्रकारचा भेदभाव नसेल. प्रत्येक जण कष्टाची भाकरी खाईल. आत्मसन्मान आणि प्रतिष्ठा जपता येईल. मानसिक श्रमाइतकेच शारिरिक श्रमालाही महत्व दिले जाईल.

**भगतसिंगांच्या स्वराज्य विषयक विचारांची प्रस्तृतता :**

ज्याकाळात कॉग्रेस ही एक परिणामकारी आणि प्रगल्भ चळवळ म्हणून देशात कार्यरत होती तेव्हा भगतसिंगानी पूर्ण स्वराज्याची मागणी केली. जी करणे कॉग्रेससारख्या बलाढय पक्षाला सर्वप्रथम जमले नाही. वसाहतीअंतर्गत स्वराज्याची मागणी कॉग्रेस करत असताना २३ वर्षाच्या भगतसिंगने पुर्ण स्वराज्याची मागणी करणे यातच त्यांच्या विचारांची परिपक्वता दिसून येते. भगतसिंगची मागणी इतकी रास्त आणि अभ्यासू होती की कॉग्रेसला ती मागणी इंग्रजाकडे करावी लागली. अस्पृश्यता निर्मुलन आणि धर्मनिरपेक्ष राष्ट्रवाद याबाबत भगतसिंगने मांडलेले विचार आजही उद्‌बोधक वाटतात. भारतीयांनी हिंदू – मुस्लिम ऐक्य करावे, हा भगतसिंगचा संदेश आजही प्रस्तुत वाटतो. जमातवादावर नियंत्रण मिळवणे, जातीय दंगलीवर विजय मिळविणे आजही आपणांस शक्य झाले नाही. शोषणमुक्त भारत आजही निर्माण झालेला नाही. धार्मिक व्देष आजही पसरवला जातो. लोकशाही धर्मनिरपेक्ष देश असताना आपली जनता धार्मिक व्देषाला बळी पडते.

भगतसिंगचा लढा हा केवळ सत्तांतरापुरता मर्यादित नव्हाता तर तो एका समग्र बदलाची मागणी करीत होता. न्याय आणि समता यावर आधारलेली नवी व्यवस्थाच

नवा मानव घडवू शकेल. आजचा मानव हवेत महाल बांधू इच्छित नाही. त्यांने आपल्या स्वर्गाचा सुंदर पाया पृथ्वीच्या याच भक्कम जमिनीवर खोदला आहे. प्रषित येऊन परिस्थिती बदलत नसते ती बदलण्यासाठी लढा दयावा लागतो. हक्कांसाठी न्यायसाठी प्रसंगी बलीदान दयावे लागते त्याशिवाय स्वातंत्र्यसमर पुर्ण होत नाही हेच भगतसिंगाने आपल्या अत्यल्प आयुष्यातून दाखवून दिले. इतर क्रांतीकारक आणि भगतसिंग यात हाच फरक आहे की भगतसिंगची स्वराज्याची मागणी ही न्याय, समता आणि समाजवादावर आधारलेली होती. स्वराज्याची मुलभूत संकल्पना डोळयासमोर ठेऊन भगतसिंग राष्ट्रवादाची उभारणी करू इच्छित होते. जोपर्यंत वर्गविरहित समाजव्यवस्था जातीविरहित समाजव्यवस्था, शोषणमुक्त राष्ट्र, न्याय आणि संधीची पुरेशी प्राप्ती होणार नाही तोपर्यंत भगतसिंगांच्या क्रांतीचे स्वप्न पूर्ण झाले असे म्हणता येणार नाही.

**संदर्भ :**


१. 'आधुनिक भारतीय राजकीय विचार : प्रवाह आणि अंत:प्रवाह,' डॉ अशोक चौसाळकर
२. 'भगतसिंग, चंद्रशेखर आझाद आणि इतर क्रांतीकारक', अजय घोष
३. शहीद भगतसिंग एक झंझावात, कॉ. प्रकाश रेड्डी
४. ' मी नास्तिक का आहे? ' शहीद भगतसिंग
५. शहीद भगतसिंग समग्र वाङ्मय, कॉ. दत्ता देसाई.